




# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com    RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे    अंक : ३११ वा    बुधवार दि ०४ मार्च २०२६    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये


# राष्ट्रहितासाठी ठाकरेंनी राज्यसभेचा हट्ट सोडावा, काँग्रेसने गणित मांडलं; समीकरण तेच, तरी मविआत पेच

वृत्तसंस्था/मुंबई

अभिषेक मनु सिंघवी, रजनी पाटील, फुलोदेवी नेताम आणि केटीएस तुलसी यांसारखे अनुभवी काँग्रेस खासदार निवृत्त होत असल्याने राज्यसभेतील काँग्रेसचे संख्याबळ १० टक्क्यांच्या खाली जाऊ शकते. अशात इतर राज्यांमध्ये राज्यसभेच्या जागांसाठी निवडणूक झाली आणि पराभव होऊन जागा गमावण्याची वेळ आलीच, तर महाराष्ट्रातील हमखास विजयाची खात्री असलेली जागा आपल्याला सोडावी, अशी मागणी काँग्रेस नेत्यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडे केली आहे. ठाकरेंनी राष्ट्रहित म्हणून महाराष्ट्रातील राज्यसभेची जागा आपल्याला सोडावी, असे आवाहन काँग्रेसने केले आहे. या ताज्या घडामोडींमुळे शरद पवार यांना राज्यसभेत उमेदवारी द्यावी या राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या मागणीवरही नवीन प्रश्नचिन्ह उपस्थित झालं आहे. ठाकरेसेनेच्या एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याने सांगितले की, खासदार सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन शरद पवार यांचे नाव राज्यसभेच्या जागेसाठी पुढे केले होते. मात्र बैठकीनंतरही अद्याप कोणतेही नाव निश्चित झालेले नाही, असे आदित्य ठाकरे यांनी एक्सवर पोस्ट करत स्पष्ट केले. बैठकीत राज्यसभेच्या जागेबाबत कोणताही निर्णय झाला नाही, पण तो लवकरच होईल, अशी माहिती आदित्य ठाकरेंनी दिली आहे. सर्व पक्ष एकमेकांच्या संपर्कात आहेत. आम्ही राज्यसभेच्या जागेवर आमचा दावा मांडला आहे, कारण संख्यात्मकदृष्ट्या आणि महाविकास आघाडीसाठी निश्चित केलेल्या रोटेशन पॉलिसीच्या दृष्टीने, ही जागा शिवसेना (उबाठा) पक्षाने लढवली पाहिजे. हे इंडिया आघाडी म्हणून आम्ही घेतलेल्या सर्व राजकीय भूमिकांशी देखील सुसंगत आहे. असं आदित्य ठाकरे म्हणाले आहेत. काँग्रेस आणि शिवसेना (ठाकरे) या जागेसाठी चर्चा करत असले तरी, ठाकरेंचे खासदार संजय राऊत यांनी शरद पवार यांच्या बाजूने उभे राहून वारंवार सांगितले आहे की ते राज्यसभेची निवडणूक लढवतील. पवार निवडणूक लढवतील याबद्दल त्यांच्या मनात कोणतीही शंका नाही असे राऊत यांनी म्हटले आहे. सोमवारी, राऊत म्हणाले की पवार कधीही एनडीएसोबत जाणार नाहीत. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत चर्चा सुरु असल्याने काँग्रेस आणि ठाकरेसेनेतील काही नेत्यांमध्ये संभ्रम आहे. काँग्रेसला विरोधीपक्ष नेतेपदाची चिंता आहे आणि शिवसेना (उबाठा) राज्यसभेतील त्यांच्या दोन जागांची चिंता आहे असंही राऊत म्हणाले.



काँग्रेसच्या एका पदाधिकाऱ्याने सांगितले की, उद्धव ठाकरे यांचा विधानपरिषद सदस्यत्वाचा कार्यकाळ एप्रिलमध्ये संपत असल्याने त्यांना पुन्हा उमेदवारी देण्यासाठी शिवसेना (ठाकरे) पाठिंबा देण्याचे काँग्रेसने म्हटले आहे. राज्यसभेची जागा मिळवणे ही केवळ पक्षकेंद्रित मागणी नाही, तर केंद्रातील इंडिया आघाडी आणि महाराष्ट्रातील महाविकास आघाडी या दोन्हीमध्ये स्थिरता राखण्यासाठी ती आवश्यक आहे. म्हणून आम्ही ठाकरेंना सांगितलं आहे, की केंद्रातील इंडिया आघाडीसाठी हे गरजेचं आहे.

# रोहित पवारांनी ऐकवली वकील अन् पिंकी माळीच्या वडिलांची कॉल रेकॉर्डिंग, रिपोर्टमधील चुकाही सांगितल्या; आरोपांचा नवा बॉम्ब

वृत्तसंस्था/मुंबई

दृश्यमानता प्रमाणापेक्षा खूपच कमी असल्यामुळे बारामती विमानतळावर उतरण्यापूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा अपघात झाला, असा प्राथमिक निष्कर्ष हवाई अपघातांचा तपास करणाऱ्या संस्थेने (एएआयबी) काढला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला २८ जानेवारीला अपघात झाला. या दुर्घटनेत पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेचा तपास ङ्गएएआयबीफ्कडे सोपवण्यात आला होता. अपघाताला एक महिना पूर्ण होत असतानाच शनिवारी या संस्थेने प्राथमिक तपास अहवाल जाहीर केला. बारामती येथे धावपट्टीवरील फिकट होत चाललेल्या खुणा आणि धावपट्टीच्या पृष्ठभागावर सैल खडी याकडे बोट दाखवताना ङ्गएएआयबीफ्ने नियंत्रण नसलेल्या विमानतळांवर उड्डाणे करणाऱ्या सर्व ऑपरेटरना निर्धारित मानक कार्यपद्धतींचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) जारी करावेत, अशी शिफारस केली आहे. एएआयबीफ्ने २२ पानांच्या अहवालात म्हटले आहे, विमानतळाकडे येताना वैमानिकांनी दृश्यमानतेविषयी विचारले होते. त्यावेळी नियंत्रण कक्षाकडून ३००० मीटर असल्याचे उत्तर मिळाले. लॅण्डिंगला परवानगी देताना हवा साधारण असल्याचे नियंत्रण कक्षाने म्हटले होते. मात्र, व्हीएफआर विमानासाठी दृश्यमानता प्रमाणापेक्षा कमी होती. बारामती विमानतळाच्या धावपट्टीच्या डाव्या बाजूला विमान जमिनीवर आदळले. त्यावेळी वैमानिकांचे अखेरचे शब्द ङ्गओह . ओह असे होतेफ. अमेरिकेच्या नॅशनल ट्रान्सपोर्ट सेफ्टी बोर्ड (एनटीएसबी) यांच्या सहकार्याने विमानातील सॉलिड स्टेट कॉकपीट व्हॉइस रेकॉर्डर (एसएससीव्हीआर) डाऊनलोड केला जाईल. सॉलिड स्टेट फ्लाइट डेटा रेकॉर्डरमधील (एसएसएफडीआर) डेटा डाऊनलोड करण्यात आला असून त्याचे विश्लेषण सुरू असल्याचे ङ्गएएआयबीनेफस्पष्ट केले आहे. ङ्गतपासाच्या कोणत्याही टप्प्यावर जेव्हा विमान वाहतूक सुरक्षितता वाढविण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना त्वरित करणे आवश्यक आहे असे वाटेल तेव्हा ते सुरक्षा शिफारशी जारी करू शकतातफ, असे एएआयबीने म्हटले आहे. दोन्ही वैमानिकांनी या आधीही बारामती विमानतळापर्यंत प्रवास केला होता. त्यामुळे त्यांना परिसराची, विमानतळाची माहिती होती.

- दोन्ही वैमानिकांनी याआधी अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी वैमानिक म्हणून भूमिका पार पाडली होती. यामध्ये इतर अनियंत्रित विमानतळांचा समावेश होता. तसेच बारामतीचाही समावेश होता.
- विमानतळावर विंडसॉकशिवाय दिशादर्शनासाठी सुविधा उपलब्ध नाही. या धावपट्टीवर दोन विंडसॉक असून दोन्ही विंडसॉक रनवे २९ च्या बाजूला आहेत. ११ च्या दिशेला एकही विंडसॉक नाही.

# वाढत्या युद्धझळा



इस्त्रायल आणि अमेरिका यांनी इराणवर हल्ले सुरू केले तेव्हाच हे स्पष्ट झाले होते, की हे युद्ध काही दोन-तीन दिवसांत संपणारे नाही. इराणवर चार-पाच आठवडे हल्ले करणार असल्याची दर्पोक्ती अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आता केली असून, गरजेनुसार सैन्य पाठविण्याची धमकीही दिली आहे. युद्ध सुरू करण्यापासून ते संपविण्यापर्यंतची सर्व सूत्रे आपल्याच हातात असल्याचेच ट्रम्प यांनी यातून सूचित केले आहे. मात्र, सर्वोच्च नेते अयातुल्लाह खामेनी यांना पहिल्याच दिवशी ठार मारल्यानंतर इराणकडून इतक्या जोरकसपणे प्रतिहल्ले होतील याची कल्पना सुरूवातीला त्यांनी केली नसावी. तूर्तास हे युद्ध पश्चिम आशियापुरते मर्यादित असले, तरी त्याच्या झळा अन्य देशांपर्यंत पोहोचल्या आहेत. युद्ध लांबत गेल्यास त्याचा मोठा परिणाम जगाला भोगावा लागेल; कारण पश्चिम आशिया ही केवळ भू-राजकीय संघर्षभूमी नाही, तर तेलसंपन्न प्रदेशही आहे आणि जागतिक व्यापारातील एक महत्त्वाचा दुवाही आहे. पर्शियन आखात आणि ओमानचे आखात यांच्या मध्ये असलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी तेलवाहतूक हा या व्यापाराचा एक महत्त्वाचा घटक. जगभरातील एकूण तेलाच्या व्यापारापैकी वीस टक्के व्यापार या सामुद्रधुनीद्वारे होतो. इराण युद्धाचा फटका या व्यापारावर होणार असून, त्यामुळे तेलाच्या किमती भडकण्याची भीती आहे. कमालीच्या वैश्विक झालेल्या आजच्या जगात एका प्रदेशातील युद्ध केवळ त्या प्रदेशापुरते मर्यादित राहत नसते, ही गोष्ट यातून पुन्हा एकदा अधोरेखित होते. त्यामुळे पश्चिम आशियातील युद्धाचा आगडोंब शांत न झाल्यास त्याची धग साऱ्या जगाला सोसावी लागणार, यात शंका नाही.

अमेरिकेला इराणचा अणुकार्यक्रम रोखण्यापेक्षा तिथे सत्ताबदल करण्यात अधिक रस आहे, तर इस्त्रायलला इराणच्या रूपाने पश्चिम आशियात स्पर्धक नको आहे. त्यामुळे त्यांनी जागतिक नियमांना धाब्यावर बसवत हे युद्ध छेडले. इराणमध्ये खामेनींची लोकप्रियता कमालीची घटली होती, त्यांच्याविरोधात जनतेत आक्रोश होता आणि लोक त्रस्त होते हे खरे; परंतु त्यामुळे खामेनींना मारण्याचा परवाना अमेरिकेला मिळालेला नव्हता. इराणी जनतेचे नाव घेत स्वहित जपण्यासाठी अमेरिकेने आणि इस्त्रायलने खामेनींना संपविले. मात्र, खामेनींच्या मृत्यूनंतर इराणी जनता एकवटल्याचे दिसते. सूडाने पेटलेल्या इराणकडून होत असलेल्या हल्ल्यांनी अरब देशांत गडबड उडाली आहे. तिथे नव्वद लाखांहून अधिक भारतीय काम करीत असल्याने या युद्धाचे परिणाम भारतातील अनेकांना जाणवत आहेत. मात्र, प्रश्न केवळ त्यांच्या सुरक्षिततेचा नाही, तर एकूणच भारत घेत असलेल्या भूमिकेचाही आहे. अशा जागतिक संघर्षात भारताने अनेकदा समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. रशिया-युक्रेन युद्धात भारताने दोन्ही देशांनी संयम बाळगावा, अशी भूमिका घेतली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा इस्त्रायल दौरा संपल्यानंतर लगेचच इराणवर हल्ले झाल्याने भारत इस्त्रायलच्या बाजूने असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. इराणवरील हल्ल्याचा आणि खामेनींच्या हत्येचा जाहीर निषेध न केल्याने हे चित्र आणखी गडद झाले असून, काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांसह विरोधकांनी भारताच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. भारत आणि इराण यांचे आजवरचे संबंध, चाबहार प्रकल्पातील भारताची गुंतवणूक, तेलावरील अवलंबित्व आदी मुद्द्यांमुळे इराणबाबत नेमके धोरण स्पष्ट होणे गरजेचे आहे. या युद्धानंतर पंतप्रधान मोदींनी ङ्गयूएईफच्या अध्यक्षांशी, तसेच इस्त्रायलच्या पंतप्रधानांशी संवाद साधला. ङ्गयूएईफ्त भारतीयांची संख्या लक्षणीय असल्याने तेथील हल्ल्यांबद्दल चिंता व्यक्त करणे स्वाभाविकच. इस्त्रायलशी असलेले सामरिक संबंध दृढ होत असल्याने तेथील पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्याशी झालेली चर्चा चुकीची नाही. मात्र, इराणबाबत असे न केल्याने भारताच्या आजवरच्या भूमिकेत बदल झाल्याचा अर्थ निघतो. इस्लामी देशांच्या ङ्गओआयसीफसंघटनेतील बहुतेक देशांनी खामेनींच्या हत्येचा निषेध केला नाही हे खरे; परंतु त्याला शिया-सुन्नी वादाचा आणि अरबी राजकारणाचा संदर्भ आहे. हे युद्ध लांबत राहिल्यास त्याचा फटका कमीत कमी बसावा यासाठीचे धोरणही भारताला आखावे लागेल. तेलाचा प्रतिबॅरल दर शंभर डॉलरपर्यंत गेल्यास महागाईचा भडका उडू शकतो. इंधन टंचाईही जाणवू शकते. दुसरीकडे रुपयाची घसरण होऊ शकते. अशा परिस्थितीतून मार्ग काढण्याचे आणि एकूणच धोरणात्मक संतुलन साधण्याचे आव्हान भारतासमोर आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सातही जागांवर उमेदवार उतरवा, शाहांच्या थेट सूचना

## अतिरिक्त २० मतांसाठी महायुतीची जुळवाजुळव



**मुंबई :** महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागांसाठी १६ मार्च रोजी होणाऱ्या निवडणुकीत, सर्वाधिक तीन ते चार जागा जिंकण्याइतके आमदार संख्याबळ असलेल्या भाजपकडून केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या व्यतिरिक्त आश्चर्याचा धक्का देणारी नावे जाहीर होऊ शकतात. यात एका अमराठी नेत्याच्या नावाचीही चर्चा आहे. विरोधकांच्या महाविकास आघाडीत उमेदवारीवरून झालेले वाद पाहता, पहिल्या टप्प्यात सहा जागांवर विजयाची खात्री असलेली सत्ताधारी महायुती ऐन वेळी सातव्या जागेसाठीही उमेदवार उतरवण्याची शक्यता आहे.राज्यसभेसाठी भाजपकडून चार उमेदवारांची नावे ठरवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी राज्य सुकाणू समितीची नुकतीच बैठक झाली. त्यात निश्चित झालेल्या नावांबाबत भाजपाध्यक्ष नितीन नवीन यांच्याशी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व राज्यातील नेते चर्चा करण्याची शक्यता आहे. येत्या एक-दोन दिवसांत भाजपचे राज्यातील उमेदवार जाहीर होऊ शकतात.परराष्ट्रमंत्री एस जयशंकर, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, आठवले या वरिष्ठ मंत्र्यांचे अपवाद वगळता भाजप राज्यसभेसाठी एका नेत्याला दुसऱ्यांदा संधी देत नाही. किंबहुना महाराष्ट्र, गुजरात, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशासारख्या राज्यांबाबत पक्षाने धोरण म्हणूनच तसे ठरविल्याचे पूर्वीची उदाहरणे सांगतात. माजी अर्थ राज्यमंत्री भागवत कराड याला अपवाद ठरणार का, असा प्रश्न यावेळी आहे. कराड, रावसाहेब दानवे व धैर्यशील पाटील यांना राज्यात काम करण्यास सांगितले जाऊ शकते, असे सूत्रांनी सांगितले.भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे व राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांचीही नावे चर्चेत आहेत. तावडे स्वतः महाराष्ट्रातून राज्यसभेवर येण्यास कितपत उत्सुक आहेत, हाही प्रश्न कायम आहे. भाजप उमेदवारांची नावे वरिष्ठ पातळीवर निश्चित झाल्याचेही सूत्रांनी स्पष्ट केले. यात एका अमराठी नेत्याचेही नाव असल्याची चर्चा आहे. राज्यसभेच्या सात जागांपैकी भाजप चार, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) एक व शिवसेना एक असे सूत्र महायुतीत निश्चित झाले आहे. सातव्या जागेसाठी मविआमधील वाद कायम असताना, या जागेवरही उमेदवार उतरविण्याची सूचना थेट गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून आल्याचे समजते. भाजपला सातवा उमेदवार निवडून आणायचा असेल, तर २० मते अतिरिक्त आणावी लागतील व ते साध्य करण्याची तयारी महायुतीने केल्याचे समजते.महाविकास आघाडीचा एक उमेदवार जिंकायचा असेल, तर तिन्ही पक्षांनी एकत्र येऊन एक उमेदवार देण्याचा पर्याय प्रत्यक्षात येण्याची चिन्हे नसल्याचे भाजप सूत्रांना वाटते. काँग्रेस आणि उबाठा शिवसेना पक्ष हे दोन पक्ष एकत्र आले, तरी त्यांच्याकडे काठावरच्या बहुमतासाठीची ३६ मते होतात.राज्यसभेची निवडणूक काही दिवसांवर आल्यामुळे आता राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सत्ताधारी भाजप या निवडणुका अत्यंत चुरशीने लढवत असल्याने त्या रंगतदार होतात.

## माजी खासदार उन्मेष पाटलांचा 'जय महाराष्ट्र', शिवसेना प्रवेशाचा मुहूर्त ठरला

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उत्तर महाराष्ट्रातील नेते आणि माजी खासदार उन्मेष पाटील यांनी उद्धवसेनेला जय महाराष्ट्र करण्याचा निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना पक्षात ते आपल्या कार्यकर्त्यांसह प्रवेश करणार आहेत.येत्या शुक्रवारी, दि.६ मार्च रोजी मुंबई येथे आपल्या कार्यकर्त्यांसह ते अधिकृतपणे शिवसेनेत प्रवेश करतील. उन्मेष पाटील यांनी 'मटा'शी बोलताना या वृत्ताला दुजोरा दिला आहे.भाजपमधून लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेमध्ये (उबाठा) उन्मेष पाटील यांनी प्रवेश केला होता. त्यांनी सोमवारी जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांची भेट घेऊन याबाबत चर्चा केली. यानंतर खासदार श्रीकांत शिंदे यांची दिल्लीत भेट घेऊन या प्रवेशावर शिक्कामोर्तब झाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची काम करण्याची पद्धत चांगली असल्याचे पाटील यांनी सांगितले.उन्मेष पाटील जळगाव लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार आहेत. भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर त्यांनी २०१९ मध्ये खासदारकी मिळवली होती. ती लोकसभा निवडणूक त्यांनी ४ लाख ११ हजार ६१७ इतक्या विक्रमी मताधिक्याने जिंकली होती, ती महाराष्ट्रात तिसरी सर्वोच्च ठरली होती.



त्याआधी २०१४ मध्ये चाळीसगाव विधानसभा मतदारसंघातून ते भाजपकडून आमदार म्हणून निवडून आले आहेत. तर २०१५ ते २०१९ या काळात महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाने महासंघ लिमिटेडचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले आहे.

## मविआत रस्सीखेच, शरद पवारांचं नाव ठरलं?

**मुंबई :** राज्यसभेच्या ३७ जागांसाठी निवडणूक पार पडत आहे. येत्या १६ मार्चला या सर्व जागांसाठी मतदान पार पडणार आहे. तसेच या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याची तारीख आता जवळ आली आहे. अर्ज दाखल करण्यासाठी केवळ दोन दिवस आता शिल्लक राहिलेले आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीचा उमेदवार कोण असावा? यासाठी हालचालींना वेग आला आहे. या निवडणुकीत महाराष्ट्रातील राज्यसभेच्या ७ जागांसाठी निवडणूक पार पडत आहे. सर्वपक्षीय बलाबल पाहता ७ पैकी ६ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी होऊ शकतात. तर महाविकास आघाडीच्या वाट्याला केवळ एका जागेवर यश मिळण्याची शक्यता आहे. या एक जागासाठी मविआत गेल्या काही दिवसांपासून रस्सीखेच सुरु आहे. अखेर या एका जागेच्या उमेदवारीसाठी आज अतिशय मोठ्या हालचाली घडल्या आहेत.राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या 'मातोश्री' निवासस्थानी जाऊन भेट घेतली. या भेटीवेळी दोन्ही नेत्यांनी उद्धव ठाकरे यांच्याकडे शरद पवार यांना राज्यसभेची उमेदवारी द्यावी, अशी विनंती केली. यावेळी तीनही नेत्यांमध्ये जवळपास तासभर चर्चा झाली. या चर्चेनंतर जयंत पाटील यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी नेमकी काय चर्चा झाली, आणि पुढची रणनीती काय असेल? याबाबत महत्त्वाची माहिती दिली.राज्यसभेच्या निवडणुकीसाठी ५ मार्चला अर्ज भरायचे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि काँग्रेस पक्ष यांच्या वतीने महाविकास आघाडीच्या वतीने सर्वांनी मिळून एक उमेदवार करावा यासाठी आम्ही उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. त्यांना आम्ही आमच्या पक्षाच्या वतीने भेट घेतली. शरद पवारांनी राज्यसभेवर पुन्हा जावं, असा आमच्या पक्षातील कार्यकर्त्यांचा, लोकसभा आणि राज्यसभेच्या सदस्यांचा आग्रह आहे. त्यामुळे आम्ही उद्धव ठाकरे यांना विनंती केली आहे. शरद पवारांसाठी आपण तीनही पक्षांनी महाविकास आघाडी म्हणून मिळून एकच उमेदवार ठरवण्याबाबत विचार करावा', अशी माहिती जयंत पाटील यांनी दिली.महाविकास आघाडीचा एकत्रितपणाने निर्णय करु, असं उद्धव ठाकरेंनी सांगितलं आहे. आमची काँग्रेस पक्षासोबत चर्चा झालेली आहे. आमच्या पक्षातील नेत्यांची भूमिका आम्ही त्यांना कळवली आहे. त्याप्रमाणे आज किंवा उद्या योग्य निर्णय होईल. आमच्या चर्चा सुरु आहेत. आज किंवा उद्या निर्णय होईल', अशी देखील माहिती जयंत पाटील यांनी दिली. यावेळी जयंत पाटील यांना शरद पवार हे राज्यसभा निवडणुकीसाठी तयार आहेत का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. त्यावर त्यांनी 'आम्ही शरद पवार यांना सगळ्यांनी मिळून आग्रह केला आहे की, त्यांनी पुन्हा राज्यसभेवर जावे.



## नितीन नवीन राज्यसभेवर जाणार; भाजपकडून ९ जणांची यादी जारी, संघटनेतील नेत्यांना संधी

**नवी दिल्ली :** सत्ताधारी भारतीय जनता पक्षानं आगामी राज्यसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली आहे. भाजपनं बिहार, आसाम, छत्तीसगड, हरियाणा, ओडिशा आणि पश्चिम बंगालमधून ९ जणांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे. संघटनेवर उत्तम पकड असणाऱ्या नेत्यांना भाजपनं राज्यसभेसाठी उमेदवारी दिली आहे. १० राज्यांमधील राज्यसभेच्या ३७ जागांसाठी १६ मार्चला मतदान होणार आहे. त्यासाठीची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. अर्ज दाखल करण्यासाठी ५ मार्च अखेरची तारीख आहे.भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन बिहारमधून राज्यसभा निवडणूक लढणार आहेत. पहिल्याच यादीत त्यांच्या नावांचा समावेश आहे. नितीन नवीन पाटण्याच्या बांकीपूरमधून पाच वेळा विधानसभेवर निवडून गेले आहेत. बिहारच्या राजकारणावर त्यांची मजबूत पकड आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी काम केलं आहे. त्यांना राज्यसभेवर संधी दिली जाईल, असा अंदाज राजकीय विश्लेषकांकडून वर्तवला जात आहे. तो खरा ठरला आहे.पश्चिम बंगालमधून भाजपनं राहुल सिन्हा यांना संधी दिली आहे. ते राज्यात पक्षाचा चेहरा म्हणून ओळखले जातात. तरुण नेते शिवेश कुमार यांनाही भाजपनं बिहारमधून संधी दिली आहे. बिहारमधील ५ जागांसाठी निवडणूक होत आहे. आसामधून भाजपनं तेराश गोवाला आणि जोगेन मोहन यांना मैदानात उतरवलं आहे. राज्याच्या राजकारणात दोघांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. आसाममधील ३ राज्यसभा जागांसाठी निवडणूक होत आहे. ओडिशातून मनमोहन समल आणि सुजीत कुमार यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. राज्यात भाजपचं सरकार आहे. त्यामुळे पक्ष मजबूत स्थितीत आहे.भाजप नं छत्तीसगडमधून लक्ष्मी वर्मा यांना राज्यसभेचं तिकीट दिलं आहे. त्या भाजप महिला मोर्चामध्ये सक्रिय राहिल्या आहेत. सामाजिक कार्यांमध्ये त्या अग्रेसर असतात. छत्तीसगडमधून राज्यसभेच्या २ जागा रिक्त होत आहेत. तर हरियाणातून सत्ताधारी पक्षानं संजय भाटिया यांना संधी दिली आहे. त्यांची प्रशासकीय पार्श्वभूमी राहिली आहे. पक्ष संघटनेत त्यांची महत्त्वाची भूमिका आहे. हरियाणातील राज्यसभेच्या २ जागा रिक्त होणार आहेत.



# पुण्यात नामांकीत व्यापाऱ्याच्या १८ वर्षीय मुलाचे अप-हरण, जेजुरी पोलिसांनी सिनेस्टाईल युवकाला वाचवलं

**पुणे :** पुणे जिल्ह्यात अपहरणाचा भयानक थरारक आज बघायला मिळाला. एका नामांकीत व्यापाऱ्याच्या मुलाचं काही आरोपींनी अपहरण करण्याचा प्रयत्न केला. आरोपी तरुणाला गाडीत घेऊन निघाले होते. पण जेजुरी पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. नाकाबंदी लावली. पोलिसांनी आरोपींच्या शोधासाठी जंग जंग पछाडलं. अखेर पोलिसांना या कारवाईत मोठं यश आलं आहे. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून तरुणाची सुखरुप सुटका केली. अपहरण झालेल्या तरुणाची सुटका करणं हे पोलिसांसाठी सोपं नव्हतं. पण पोलिसांनी अतिशय संयमी पद्धतीने परिस्थिती हाताळत आरोपींना सळो की पळो करुन सोडलं. त्यामुळे तरुणाला गाडीत सोडून आरोपींना



पलायन करावं लागलं. पोलिसांनी पीडित तरुणाला सुखरुप शोधून काढलं आहे. त्यामुळे त्याच्या कुटुंबियांना मोठा दिलासा मिळाला आहे.पुणे जिल्ह्यातील कापूरहोळ परिसरात मंगळवारी (३ मार्च) दुपारी घडलेल्या अपहरणाच्या घटनेमुळे एकच खळबळ उडाली. स्थानिक नाम ंकित व्यापाऱ्याच्या १८ वर्षीय मुलाचे भरदिवसा अपहरण करण्यात आले होते. मात्र, मात्र जेजुरी पोलीस आणि ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे अवघ्या काही तासांतच युवकाची सुखरूप सुटका करण्यात पोलिसांना यश आले.याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, आज दुपारी कापूरहोळ येथून दणत कारमधून संबंधित युवकाला जबरदस्तीने घेऊन जाण्यात आले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती तत्काळ पोलिसांना देण्यात आली. युवकाच्या वडिलांनी ग्रामसुरक्षा यंत्रणेद्वारेही मदतीसाठी संपर्क साधला.माहिती मिळताच जेजुरी पोलीस आणि निरा पोलिसांनी जेऊर आणि नीरा परिसरात तात्काळ नाकाबंदी केली. संशयित वाहनाचा शोध सुरू असतानाच जेऊरकडून पिसुर्टीकडे जाणारी एक संशयित कार पोलिसांच्या नजरेस पडली. पोलिसांनी कार अडवण्याचा प्रयत्न केला असता, रस्ता अरुंद असल्याने ती कार ऊसाच्या शेतात जाऊन अडकली.

या गोंधळाचा फायदा घेत अपहरणकर्ते घटनास्थळावरून पसार झाले. मात्र पोलिसांनी तत्परतेने कारमधील युवकाची सुरक्षित सुटका केली आहे. ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे आणि तात्काळ नाकाबंदी केल्यामुळे मुलाची सुरक्षित सुटका शक्य झाली. आरोपींचा शोध सुरू आहे, अशी माहिती पोलीस अधिकारी दीपक वाकचौरे यांनी दिली. या प्रकरणाचा अधिक तपास जेजुरी पोलीस करत आहे.

## कार चारदा पलटून विहिरीच्या कठड्यावर अडकली, तरुणाचा मृत्यू

**बीड :** सण-उत्सवाचा आनंद साजरा करण्यासाठी घराबाहेर पडलेल्या तरुणांच्या उत्साहाचे रूपांतर भीषण शोकांतिकेत झाली. बीड-शिरूर रोडवरील नागऱ्याची वाडी परिसरात पहाटेच्या सुमारास झालेल्या एका भीषण कार अपघातात बीड शहरातील २२ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचे तीन मित्र गंभीर जखमी झाले आहेत.बीड शहरातील रामतीर्थ परिसरातील रहिवासी असलेला कृष्णा जालिंदर मुळे (वय २२) हा आपल्या काही मित्रांसोबत धुलिवंदन साजरा करण्यासाठी शेजारील जिल्ह्यातील एका रिसॉर्टवर जाण्याचे नियोजन करून निघाला होता. या सहलीसाठी मित्र परिवाराने व्हेरना आणि थार अशा दोन अलिशान गाड्यांचा वापर केला होता. सोमवारी पहाटेच्या सुमारास हे सर्व जण बीडहून शिरूर कासारमार्गे निघाले होते. प्रवास सुरू असताना नागऱ्याची वाडीजवळ पोहोचल्यावर व्हेरना कारवरील चालकाचे नियंत्रण सुटले. गाडीचा वेग इतका प्रचंड होता की, चालकाचे नियंत्रण सुटल्याबरोबर कारने रस्त्यावरच तीन ते चार पलट्या खाल्ल्या. अनियंत्रित झालेली ही कार शेतातील एका विहिरीच्या दिशेने



वेगाने गेली. विहिरीच्या सिमेंटच्या कठड्याला जाऊन जोरदार धडकली आणि कठड्याला लटकली.या भीषण धडकेत कृष्णा जालिंदर मुळे या तरुणाला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याच्यासोबत कारमध्ये असलेले प्रसाद खोले, यश पेंढारे आणि अन्य एक मित्र असे तिघेजण जखमी अवस्थेत पडले होते. त्यांच्या पाठीमागून 'थार' गाडीत येत असलेल्या मित्रांनी अपघात पाहताच तात्काळ धाव घेतली आणि जखमींना गाडीबाहेर काढले.जखम पैकी प्रसाद खोले याची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने त्याला प्राथमिक उपचारानंतर तातडीने छत्रपती संभाजीनगर येथील मोठ्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे. तर यश पेंढारे आणि त्यांच्या दुसऱ्या एका मित्रावर बीड येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## जवानाने सातारा गाठलं, पण सुट्टी शेवटची ठरली

**सातारा :** साताऱ्यात एका कुटुंबात आनंदाच्या वातावरणाचं रुपांतर दु:खात बदललं आहे. त्यामुळे कारणही तसंच आहे. भारतीय सैन्यात कार्यरत असलेल्या जवानाचा साताऱ्यात लग्नासाठी गावी आले असताना त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. सावत्र भावाच्या लग्नासाठी सुट्टीवर आलेल्या आणि दोन दिवस बेपत्ता असलेल्या कोरेगाव तालुक्यातील जवानाचा मृतदेह नदीपात्रात तरंगताना आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. सूरज सयाजी नलवडे (वय ३५), असे मृत जवानाचे नाव आहे. ते नलवडेवाडी गावचे रहिवासी होते. बोरगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत नांदगाव येथील कृष्णा नदीपात्रात त्यांचा मृतदेह आढळून आला. या घटनेने रहिमतपूर परिसरावर शोककळा पसरली आहे.सूरज नलवडे हे सैन्य दलात होते. त्यांचा सावत्र भाऊ संकेत याचे म गील रविवारी (२६ फेब्रुवारी) लग्न होते. भावाच्या लग्नासाठी सूरज रजा घेऊन गावी आले होते. त्याच दिवशी रात्री ते बेपत्ता झाले. रात्री उशिरापर्यंत ते घरी परत न आल्याने कुटुंबीयांनी नातेवाईक आणि मित्रांच्या मदतीने शोधाशोध केली. मात्र, त्यांचा ठावठिकाणा लागत नव्हता.

## बारामतीत प्रेमीयुगुलाला कोयत्याने मारहाण ; सोन्या-चांदीचे दागिनेही लुटले

**बारामती :** बारामतीतील तांदुळवाडी येथे एलसी कंपनी लेक परिसरात तरुणावर कोयत्याने वार करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लुटल्याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून ३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २६ फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे ८.४० वाजण्याच्या सुम ारास बारामतीतील तांदुळवाडी विमानतळ रोडलगत असलेल्या एलसी कंपनी लेक येथील मोकळ्या जागेत फिर्यादी संतोष रायनवार (बदलेलं नाव) (मूळ राहणार, नागपूर वय २६, हल्ली बारामती) हे त्यांच्या मैत्रिणीसोबत बसले होते. त्यावेळी तोंडाला मास्क व रुमाल बांधलेल्या तिघा इसमांनी त्यांच्या जवळ येत लोखंडी सत्तूर, कोयत्याचा धाक दाखवून पैशांची मागणी केली. विरोध केल्यावर एका आरोपीने फिर्यादीच्या डाव्या पायावर वार करून जखमी केले. त्यानंतर आरोपींनी सोन्याची सुमारे २१ ग्रॅम वजनाची चैन (किंमत ३ लाख रुपये), चांदीची अंगठी (५ हजार रुपये), चांदीची चैन (१५ हजार रुपये), आणखी एक चांदीची अंगठी (२ हजार रुपये) व २ हजार रुपये रोख



असा एकूण ३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने काढून घेतला व 'परत इकडे यायचं नाही' अशी धमकी देत तेथून पसार झाले.याप्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात येथे बी.एन. एस कलम ३०९(६),३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून तपासा दरम्यान प्रसाद गणपत भोसले वय २४, धैर्यशील प्रशांत आगवणे, वय १९ व कृष्णा नाना गाडेकर वय २१ (सर्व रा. तांदुळवाडी, ता.बारामती) यांना २८ फ ेब्रुवारी रोजी अटक करण्यात आली. न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# पुण्यात टवाळखोरांकडून भटक्या कुत्र्याला अमानुष मारहाण

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड शहरात मानवतेला काळिमा फासणारी आणि अंगावर काटा आणणारी घटना समोर आली आहे. एका भटक्या कुत्र्याला काही माथेफिरूंनी भर रस्त्यात निर्दयीपणे मारहाण करत हवेत फिरवून जमिनीवर आपटलं. इतकंच नाही, तर त्याला चारचाकी वाहनाने उडवण्याचाही प्रयत्न करण्यात आला. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील तुकाराम नगर पोलीस स्टेशन हद्दीत २८ फेब्रुवारीच्या मध्यरात्री ही धक्कादायक घटना घडली. रात्री साधारण एक वाजण्याच्या सुमारास आरोपी स्वप्निल सखाराम सावंत याने रस्त्यावर उभ्या असलेल्या एका भटक्या कुत्र्याला



पाठीमागून हातात पकडलं.प्रत्यक्षदर्शी आणि सीसीटीव्ही फुटेजनुसार, आरोपीने त्या निष्पाप प्राण्याला हवेत गोल फिरवत जोरात जमिनीवर आपटलं. या अमानुष मारहाणीत कुत्रा गंभीर जखमी झाला. या घटनेनंतरही आरोपी आणि त्याच्या सोबत असलेल्या सहा ते सात जणांनी भर रस्त्यात आरडाओरडा करत नाच केला आणि धिंगाणा घातला. धक्कादायक बाब म्हणजे, त्यानंतर आरोपींकडे असलेल्या चारचाकी वाहनाने भरधाव वेगाने जाऊन रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या जखमी कुत्र्याला उडवण्याचा प्रयत्नही करण्यात आला. सुदैवाने कुत्रा थोडक्यात बचावला असल्याची माहिती मिळते.ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, फुटेज सोशल मीडियावर व्हायरल होताच नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणी एका तरुणाने धाडस दाखवत पोलिसांकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर संत तुकाराम नगर पोलीस ठाणे येथे आरोपी स्वप्निल सखाराम सावंत याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे इतर सहभागी आरोपींची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. निष्पाप प्राण्यांवर होणाऱ्या अशा क्रूर घटनांमुळे समाजात संताप व्यक्त होत आहे. आरोपींवर कठोर कारवाई व्हावी आणि अशा प्रकारांना आळा बसावा, अशी मागणी प्राणीप्रेमी आणि नागरिकांकडून केली जात आहे. मानवतेला काळिमा फासणाऱ्या या घटनेवर आता पोलिस काय कठोर पावले उचलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागलं आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बीसीसीआयने घेतला निर्णय; झहीर खान, हरभजन सिंगकडे सोपवली जबाबदारी

**मुंबई/वृत्तसंस्था :** सध्या टी-२० विश्वचषक सुरु आहे. आता विश्वचषक अंतिम टप्प्यांत पोहोचला आहे. सेमीफायनलसाठी चार संघ आता पक्के झाले आहेत. भारत, इंग्लंड, न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका हे संघ सेमीफायनलसाठी क्लिफाय झाले आहेत. आता विश्वचषकाची स्पर्धा सुरु असताना बीसीसीआय ने एक मोठा निर्णय घेतला आहे. भारतीय संघाची पडती बाजूवर काम करण्यासाठी आता बीसीसीआय सज्ज झाली आहे.बीसीसीआय माजी वेगवान गोलंदाज झहीर खान बेंगळुरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्स येथे वेगवान गोलंदाजांना प्रशिक्षण देण्याची शक्यता आहे. अहवालानुसार बीसीसीआयने झहीर खानशी बीसीसीआयच्या विशेष प्रशिक्षण शिबिरात सेवा देण्यासाठी संपर्क साधला आहे. झहीर खान या आठवड्यात बेंगळुरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्स येथे एक विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करेल, ज्यामध्ये तरुण खेळाडूंना वेगवान गोलंदाजीचे बारकावे शिकवले जातील. बोर्डाने या शिबिरांसाठी निवडक खेळाडूंची यादी तयार केली




आहे.पीटीआयच्या वृत्तानुसार, झहीर खान, हरभजन सिंग आणि अनिल कुंबळे यांच्यासह, फिरकी गोलंदाजांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिरासाठी संपर्क साधण्यात आला आहे. ट्रॉय कूली यांच्या निवृत्तीनंतर बेंगळुरू सेंटर ऑफ एक्सलन्स येथे वेगवान गोलंदाजी प्रशिक्षकाचे पद रिक्त आहे. बीसीसीआयने ९ फेब्रुवारी रोजी या पदासाठी अर्ज मागवले होते, परंतु अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. वृत्तानुसार, 'झहीर खानच्या देखरेखीखाली २८ फेब्रुवारी ते २ मार्च दरम्यान बेंगळुरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्स येथे एक विशेष जलद गोलंदाजी शिबिर आयोजित केले जात आहे. यासाठी राज्य क्रिकेट संघटनांमधील निवडक जलद गोलंदाजांना आमंत्रित करण्यात आले आहे. सेंटर ऑफ एक्सलन्सचे क्रिकेट प्रमुख व्हीव्हीएस लक्ष्मण यांनीही या उपक्रमात उत्सुकता दाखवली आहेसूत्र पुढे म्हणाले, 'झहीर खान कोचिंगची जबाबदारी स्वीकारण्यास खूप उत्सुक आहे. तो यापूर्वी लखनौ सुपर जायंट्सशी संबंधित आहे आणि त्याला विश्वास आहे की तो त्याच्या अनुभवाने खेळाडूंच्या नवीन पिढीला लक्षणीयरीत्या मदत करू शकेल. त्याच्यासारख्या अनुभवी जलद गोलंदाजाने इउउख च्या या कार्यक्रमात रस दाखवला आहे हे चांगले आहे. तो उए मध्ये पूर्णवेळ भूमिका घेण्यास तयार होईल का हे पाहणे बाकी आहे, कारण त्यासाठी त्याला दीर्घकाळ त्याच्या कुटुंबापासून दूर राहावे लागू शकते.'इउउख च्या मते, उजए ला अशा प्रशिक्षकाची आवश्यकता आहे जो मुख्य प्रशिक्षक आणि उर्वरित प्रशिक्षक कर्मचाऱ्यांसोबत जवळून काम करू शकेल. त्याचा उद्देश वरिष्ठ आणि कनिष्ठ खेळाडूंसाठी विशेष जलद गोलंदाजी प्रशिक्षण विकसित करणे, खेळाडूंच्या कामाच्या ताणाचे निरीक्षण करणे, नवीन प्रतिभा ओळखणे आणि त्यांच्या कामगिरीचे निरीक्षण करणे आहे.

भारतीय संघाच्या जलद गोलंदाजीला अनेकदा आव्हानांचा सामना करावा लागला आहे. जसप्रीत बुमराह हा संघाचा मुख्य आधार आहे, परंतु त्याच्या अनुपस्थितीत, जबाबदारी मोहम्मद सिराजवर येते, तर इतर जलद गोलंदाज सातत्यपूर्ण प्रभाव पाडण्यात अपयशी ठरले आहेत. प्रसिद्ध कृष्णा आणि शार्दुल ठाकूर देखील रेड-बॉल क्रिकेटमध्ये सातत्यपूर्ण प्रभाव पाडण्यात अपयशी ठरले आहेत. दरम्यान, तिन्ही फॉरमॅटमध्ये खेळणारा हर्षित राणा देखील सातत्यपूर्णतेसाठी संघर्ष करत आहे.

## टीम इंडिया अंतिम फेरीत जाणार नाही, पाक खेळाडूचं भाकित

**मुंबई :** संजू सॅमसनने ५० चेंडूत नाबाद ९७ धावा केल्यामुळे भारताला टी२० विश्वचषकाच्या सुपर-८ फेरीतील शेवटच्या सामन्यात बाजी मारत उपांत्य फेरीत प्रवेश मिळाला. मात्र पाकिस्तानचा यामुळे चांगलाच तीळपापड झाला आहे. विंडीजविरुद्धच्या सामन्यात भारताला पराभवाचा सामना करावा लागेल, असे पोकळ दावे करणारा पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज मोहम्मद आमीर याने आता पुन्हा एकदा टीम इंडियाच्या पराभवाचं फुसकं भाकित वर्तवलं आहे. कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर वेस्ट इंडिजने केलेल्या १९६ धावांचा टीम इंडियाने यशस्वी पाठलाग केला. भारताने विंडीजला ५ गडी राखून पराभूत केले. आता ५ मार्च रोजी मुंबईत होणाऱ्या उपांत्य फेरीत भारताचा सामना इंग्लंडशी होणार आहे, तर त्याआधी ४ मार्च रोजी कोलकाता येथे होणाऱ्या उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड एकमेकांना भिडतील.पाकिस्तानच्या आजी-माजी खेळाडूंना भारताचा उपांत्य फेरीतील प्रवेश पचवणं कठीण जात आहे. खरं तर, वेस्ट इंडिज विरुद्ध भारत हा सामना होण्यापूर्वी, पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज मोहम्मद आमीर याने 'भारत उपांत्य फेरीत पोहोचणार नाही' असा छातीठोक दावा केला होता, परंतु त्याचे अंदाज साफ चुकीचे ठरले.मात्र मोहम्मद आमिर इतक्यावर थांबला नाही, कारण त्याने आता पुन्हा एकदा बेडक्या फुगवल्या आहेत. आमिर म्हणाला की भारत अंतिम फेरीत पोहोचणार नाही. एका व्हिडिओमध्ये, मोहम्मद आमिरने भारताच्या उपांत्य फेरीतील अपयशावर भाष्य करताना म्हटलं आहे की, 'हे पहा, माझं विश्लेषण असं होतं. संजू सॅमसन चांगला खेळला. पण मला वाटतं की त्यांनी (टीम इंडियाने) अद्याप त्यांची पूर्ण खेळी खेळलेली नाही.

## सेमी फायनलपूर्वी टीम इंडियाच्या प्रॅक्टीस सेशनला 'ग्रहण'; वानखेडेमधील सराव सत्र पुढे ढकललं

**मुंबई/वृत्तसंस्था :** उपांत्य फेरीच्या आधी भारतीय संघाच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवले जात आहे. रणनीती, प्लेइंग इलेव्हन आणि नेट तयारी या सर्वांवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. परंतु मंगळवारी, संघाचे सराव सत्र एका कारणामुळे चर्चेचा विषय बनले. सेमीफायनलचा सामना असूनही भारतीय संघाने आपला सराव सामना रद्द केला. पण रद्द करण्यामागे एक विशेष कारण आहे ते जाणून घ्या...वृत्तानुसार, भारतीय पुरुष क्रिकेट संघाने चंद्रग्रहणामुळे त्यांचा सराव वेळ पुढे ढकलला. एका वृत्तानुसार, ड्रीमइलेव्हन संघाने त्यांच्या सराव



सत्राची सुरुवात बदलली. वानखेडे स्टेडियमवर गुरुवारी होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या महत्त्वाच्या उपांत्य सामन्यापूर्वी भारतीय संघ मंगळवारी संध्याकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत मुंबईच्या प्रतिष्ठित वानखेडे स्टेडियमवर सराव करणार होता.आज म्हणजे ३ मार्च २०२६ रोजी दुपारी ३:२० वाजता चंद्रग्रहण सुरू झाले आणि ते संध्याकाळी ६:४५ पर्यंत चालले. वृत्तानुसार, चंद्रग्रहणाच्या वेळी सराव सत्र सुरू होईल हे कळताच संघाने परिस्थितीवर चर्चा केली. एका सूत्राने सांगितले की, 'चंद्रग्रहणाच्या वेळी कोणतेही शुभ कार्य सुरू करू नये हे संघाला कळले. भारत इंग्लंडविरुद्ध उपांत्य सामना खेळत असल्याने, संघ सकारात्मक सुरुवात करू इच्छित होता. अनेकांचा असा विश्वास होता की संध्याकाळी ६:४० पर्यंत कोणताही क्रियाकलाप टाळावा. संघ व्यवस्थापनाने सहमती दर्शवली आणि सराव सत्र एक तास पुढे ढकलण्यात आले. सेमीफायनलसारख्या मोठ्या सामन्यापूर्वी, खेळाडू देखील मानसिकदृष्ट्या स्वतःची तयारी करतात. आता, सर्वांचे लक्ष गुरुवारी होणाऱ्या सामन्यावर म्हणजे ५ मार्च २०२६ रोजी रंगणार आहे, जिथे भारत आणि इंग्लंड यांच्यात हाय-व्होल्टेज उपांत्य सामना खेळला जाईल. उद्या म्हणजे ४ मार्च २०२६ रोजी न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सेमी फायनलचा सामना रंगणार आहे. अंतिम आणि फायनल सामना हा अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये रंगणार आहे. आता भारतीय संघ पुन्हा एकदा टी-२० विश्वचष जिंकण्यासाठी सज्ज झाला आहे.

## संजूने केलं होतं विशेष प्लॅनिंग; भारताच्या विजयानंतर सांगितली इनसाइड स्टोरी

**मुंबई/वृत्तसंस्था :** टी-२० विश्वचषकातील सुपर आठमधील सामना वेस्ट इंडिजविरुद्ध भारत यांच्यात रंगला. भारतीय संघाने हा सामना पाच विकेट्सने जिंकला. सामना जिंकल्यामुळे भारताला सेमीफायनलचं तिकीट पक्के करता आले. या सामन्यात संजू सॅमसन हा विजयाचा नायक ठरला. अनेकदा संघातून वगळला जाणारा संजू मात्र या महत्त्वाच्या सामन्यात खेळला. याबद्दल संजूने काय म्हटले आहे ते पाहा...खराब फॉर्मच्या काळातही आत्मविश्वास अबाधित ठेवण्यासाठी भारतीय सलामीवीर डरपक्षी डरीप आपले फोन आणि इंटरनेट मीडिया अकाउंट बंद केले आणि अखेर वेस्ट इंडिजविरुद्धच्या टी-२० विश्वचषक सामन्यात त्याने सामना जिंकून देणारी खेळी करून आपला फॉर्म परत मिळवला. सॅमसनने ५० चेंडूत ९७ धावा केल्या, ज्यामध्ये १२ चौकार आणि चार षटकारांचा समावेश होता. त्याच्या खेळीमुळे भारताला विजय आणि उपांत्य फेरीत स्थान मिळवून देण्यात मदत झाली. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध भारताच्या




दारुण पराभवानंतर त्याला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान देण्यात आले.'मी सतत माझ्या शॉट सिलेक्शनवर काम करत होतो. मला माहित होते की मी पूर्वीही अशाच प्रकारे चांगले खेळले आहे. म्हणून मी स्वतःवर माझा विश्वास ठेवला, माझा फोन बंद केला, सोशल मीडियापासून दूर राहिलो आणि माझ्या आतल्या आवाजाचे ऐकले,' सॅमसनने स्टार स्पोर्ट्सला सांगितले. खूप खास असलेल्या सामन्यात मी चांगली कामगिरी केली याचा मला आनंद आहे. सॅमसनने जवळजवळ एकट्याने भारताला लक्ष्यापर्यंत नेले. त्याला कर्णधार सूर्यकुमार यादव (१८) आणि तिलक वर्मा (२७) यांची थोडीशी साथ मिळाली.'हे थोडे कठीण लक्ष्य होते. आमच्या फलंदाजीच्या ताकदीमुळे, मला वाटले की ईडन गार्डन्सवर दव पडल्याने १९६ धावांचा पाठलाग करणे थोडे सोपे होईल, परंतु नियमित अंतराने विकेट्स पडणे आव्हानात्मक बनले, माझ्या अनुभवाने महत्त्वाची भूमिका बजावली. मला चांगली सुरुवात मिळाली, परंतु जेव्हा विकेट्स पडत राहिल्या, तेव्हा मला वाटले की मला सामना सकारात्मक पद्धतीने संपवावा लागेल.' संजूने स्पष्ट केले.तुम्हाला नेहमीच अशी कामगिरी करायची असते, पण नेहमीच असे होत नाही. म्हणून, मला आनंद आहे की मी या सामन्यात चांगली कामगिरी केली. जेव्हा तुम्ही दबावाखाली लक्ष्याचा पाठलाग करत असता तेव्हा तुम्ही वेगवेगळे पर्याय वापरून पाहता आणि धोकादायक पर्याय घेण्याऐवजी अधिक चौकार मारता.' न्यूझीलंडविरुद्ध्या घरच्या मालिकेतील त्याच्या निराशाजनक कामगिरीबद्दल बोलताना, सॅमसनने त्याच्या तंत्रात केलेल्या बदलांचे स्पष्टीकरण दिले.' सॅमसन म्हणाला. संजू म्हणाला, 'मानवी स्वभाव आहे की तो अनेकदा नकारात्मक विचारांनी सुरुवात करतो, जसे की, 'मी हे करू शकतो का? मला वाटत नाही की मी हे करू शकतो.' जेव्हा जेव्हा असे विचार माझ्या मनात येतात तेव्हा मी त्याऐवजी सकारात्मक विचारांनी बदलण्याचा प्रयत्न करतो. मला न्यूझीलंडविरुद्ध चांगली कामगिरी करायची होती, पण गोष्टी माझ्या मनाप्रमाणे झाल्या नाहीत. सुदैवाने, मला १० दिवसांची सुट्टी मिळाली.'

सॅमसन म्हणाला, मी आत्मपरीक्षण केले. मी माझ्या पायावर आणि मी स्वतःला कसे तयार केले यावर काम केले. अनेकांनी मला सूचना दिल्या. मी स्वतःला सांगितले, 'संजू, तू या फॉरमॅटमध्ये तीन आंतरराष्ट्रीय शतके झळकावली आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# श्वानाने माझ्या मांडीचा चावा घेतला' रमेश परदेशींसोबत घडला भयानक प्रकार

**मुंबई :** मराठी अभिनेते रमेश परदेशी सोशल मीडियावर कायम सक्रीय असतात. रमेश सामाजिक तसेच राजकीय घडामोडींवर भाष्य करणाऱ्या पोस्ट शेअर करतात. अशातच आता अभिनेत्यानं केलेली एक पोस्ट चर्चेचा विषय ठरली आहे.रमेश परदेशी यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत लिहिलं की, 'टेकडीवर कोण असायला हवं ससे, मोर, फिरायला येणारी तरुण, लहान मुलं, वृद्ध मालकांसोबत येणारी पाळीव प्राणी, वृक्ष प्रेमी की अभटकीमकुत्री?...काल नेहमीप्रमाणे अठअश्र टेकडीवर पळायला गेलो होतो पळत असताना एका ठिकाणी ४ ते ५ कुत्री खात होती. तिथून जाताना त्यातल्या एका कुत्र्याने माझ्या मांडीचा चावा घेतला. मी तसंच पुढे गेलो तर, म इझ्यासारखाच एक प्राणी प्रेमी मित्र १० ते १२ कुत्र्यांना खायला देत होता (मी पण कधी-कधी सीटी मध्ये उपाशी कुत्र्यांना पाव,बिस्किट देत असतो) मी त्याला बोललो अरे इथे नको देऊ खायला, मला आताच





एक कुत्रा मागे चावलाय. मेन रोडवर दे नाहीतर हे कुत्रे लहान मुल, वृद्ध ह्यांच्या अंगावर येतात आणि मी निघून गेलो.'घरी आल्यावर आंघोळ करताना लक्षात आलं, आपल्याला मघाशी किरकोळ चावलंय अस वाटलेलं ते जास्त दुखतंय. म्हणुन सकाळी सरकारी दवाखान्यात गेलो तर त्यांनी सांगितलं टोटल ५ इंजेक्शन घ्यावी लागतील. काही तरी टाइप ३ आहे म्हणून. आता २ घेतली अजून ७ दिवसाच्या अंतरानं बाकी घ्यायची आहेत.. हेच एखाद्या लहान मुलाला किंवा वृद्ध माणसाला चावलं असतं तर केवढ्याला पडलं असतं... ? मी पण प्राणी प्रेमी आहे. पण, मला वाटतंय ह्या भटक्या कुत्र्यांची काहीतरी बरी सोय केली पाहिजे. राहणं, खाण्याची. आज एक अंगावर आला चावला. मी प्रतिकार करू शकलो, पण १०/१२ एकदम अंगावर आले तर बरं वाईट काही झालं तर जबाबदार कोण? अजून खूप जबाबदाऱ्या अंगावर आहेत.'शहरातल्या भटक्या कुत्र्यांना जर एका ठिकाणी जमा केलं आणि त्यांची नसबंदी केली तर तिलचं काम पण एका ठराविक ठिकाणी रीतसर आणि सुसह्य होईल, जे कोणी प्राणीप्रेमी मित्र आहेत ते त्या ठिकाणी येऊन त्यांच्याशी खेळतील त्यांचं आजारपण डॉक्टर सगळं एकाठिकाणी होईल.. माणसं रस्त्यावर आणि टेकडीवर सुरक्षित फिरतील, कुत्री घाबरून भीतीपोटी त्यांच्यावर रींरिलज्ञ करणार नाहीत.. माणसाचा आणि कुत्र्याचा दोघांचा जीव अतिशय महत्वाचा आहे दोन्ही जीव सुरक्षित राहतील.. सरकारला विनंती आहे की त्यांनी ह्याची दखल घ्यावी.'

# अबू धाबी विमानतळावर अडकलेली अभिनेत्री ईशा गुप्ता सुखरूप मायदेशी परतली



**चेन्नई :** अमेरिका-इराण संघर्षामुळं निर्माण झालेल्या तणावाच्या परिस्थितीत संयुक्त अरब अमिरातीमध्ये (णअए) अडकलेली बॉलिवूड अभिनेत्री ईशा गुप्ता अखेर सुखरूप मायदेशी परतली आहे. सोमवारी, २ मार्च रोजी ती विमानानं दिल्लीत पोहोचली. भारतात परतल्यानंतर तिनं सोशल मीडियावर एक सविस्तर पोस्ट लिहून त्या कठीण काळातील भावना व्यक्त केल्या आहेत.२८ फेब्रुवारी रोजी ईशा गुप्ता भारतात परतण्यासाठी अबू धाबी विमानतळावर पोहोचली होती. मात्र, त्याच वेळी इराणवर झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांच्या बातम्यांमुळं मध्य पूर्वेतील हवाई क्षेत्रात मोठा धोका निर्माण झाला. दुपारी १ च्या सुमारास अचानक अबू धाबी विमानतळ बंद करण्यात आलं होतं. विमानं रद्द झाल्यामुळं आणि विमानतळावर निर्माण झालेल्या गोंधळामुळं ईशा तिथंच अडकून पडली होती.ईशानं आपल्या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये म्हटलं आहे की, 'मी घरी परतले आहे. तुमच्या प्रार्थना आणि शुभेच्छांसाठी आभार. त्या परिस्थितीत असणं अत्यंत कठीण होतं. २८ तारखेला मी विमानतळावर असताना अचानक सर्व काही ठप्प झालं. कुणालाच काही कळेनासं झालं होतं. त्यानंतर क्षेपणास्त्र हल्ल्याची बातमी आली आणि प्रत्येक क्षण भीतीदायक वाटू लागला. अनोळखी लोक एकमेकांना धीर देत होते आणि आपापल्या कुटुंबाला फोन करत होते.तिनं पुढं सांगितलं की, परिस्थिती इतकी तणावपूर्ण होती की, मोबाईलवर सतत 'संरक्षित ठिकाणी आश्रय घ्या' असे अलर्ट येत होते. 'आम्ही घाबरलो होतो, पण युएई प्रशासनानं आणि हॉटेल कर्मचाऱ्यांनी परिस्थिती खूप संयमानं हाताळली,' असंही तिनं नमूद केलं.ईशा गुप्तानं युएई सरकार आणि विमानतळ कर्मचाऱ्यांचं कौतुक केलं. अडकलेल्या प्रवाशांसाठी तात्काळ जेवण आणि राहण्याची सोय करण्यात आली होती. तसंच, भारताकडे परतणाऱ्या प्रवाशांना मदत केल्याबद्दल तिनं भारत सरकारचंही आभार मानलं आहे.

# गौतमी पाटीलचे गाणे व्हायरल



**मुंबई :** सिनेमातील गाण्याविषयीही तिनं भावना व्यक्त केल्या. ती म्हणाली, 'या गो बायांनो हळद घेऊनशी' हे गाणं म्हणजे लग्नसोहळ्यातील उत्साह, पारंपरिक ढंग आणि आधुनिक सादरीकरण यांचा सुंदर मिलाफ आहे. गीतकार आणि संगीतकार विजय गाडेकर यांच्या लेखणीतून साकारलेलं हे गाणं महाराष्ट्राची लाडकी गायिका वैशाली सामंत यांच्या आवाजात अधिक खुलून आलं आहे. प्रेक्षकांनी मला नेहमीच प्रेम दिलं आहे. या गाण्यातील माझा नृत्याविष्कारही त्यांना आवडेल, अशी मला खात्री आहे. रहस्यमय मर्डर मिस्ट्री असलेल्या या सिनेमाचं दिग्दर्शन उदय जाधव यानं केलं असून त्यात चिन्मयी सुमीत, गणेश यादव, प्रणव रावराणे, राहुल पाटील, पूजा जैस्वाल, निलेश भेरे, वेदांत खोत, रेखा राणे, अजय पाध्ये आणि गौतमी पाटील अशी कलाकारांची फळी आहे. दीपा सावंत-खोत हिनं या सिनेमाची निर्मिती केली आहे.दरम्यान, गेल्या दोन वर्षात अनेक मराठी सिनेमात गौतमीच्या डान्सचा जलवा पाहायला मिळाला होता. आता या सिनेमातही ती आयमट सॉन्गमध्ये दिसणार असल्यानं तिच्या चाहत्यांना उत्सुकता आहे.

# मला आई व्हायचं नाही, हा निर्णय मी एका फटक्यात घेतलेला नाही, नेहा पेंडसेचं वक्तव्य चर्चेत..



**मुंबई :** नेहा पेंडसे ही मराठी कलाविश्वातील सुप्रसिद्ध अभिनेत्री असून तिनं हिंदी मालिकांमध्येही काम केलं आहे. नेहा पेंडसेनं मराठीसोबतच दाक्षिणात्य सिनेमांमध्येही काम केलं आहे. नेहा, 'मे आय कम इन मॅडम' या हिंदी आणि 'भाग्यलक्ष्मी' या मराठी मालिकेतून घराघरात पोहोचली. नेहानं २०२० मध्ये उद्योगपती शार्दूल बायससोबत लग्न केलं. आता अभिनेत्रीच्या लग्नाला सहा वर्षे झाली असून तिनं नुकत्याच एका मुलाखतीमध्ये 'मला आई व्हायचं नाही' असं म्हणाली आहे. यामागचं कारणही अभिनेत्रीनं सांगितलंय.नेहा पेंडसेनं नुकतीच 'राजश्री मराठी'ला मुलाखत दिली. या मुलाखतीदरम्यान नेहा म्हणाली की, 'मला आई व्हायचं नाही. लग्नाला सहा वर्ष झाली पण मला आई होण्याची इच्छा नाही. हा काही मी एका झटक्यात घेतलेला निर्णय नाही. मी माझे एग्स फ्रीज केले आहेत. कारण लग्नानंतर मला एका पॉइंटला आई व्हायची तीव्र इच्छा झाली होती. पण तेव्हा मी आई होऊ शकले नाही. त्या प्रक्रियेत मी खूप निराश झाले होते.

'मी त्या प्रक्रियेत इतकी वैतागले की 'नाही, आता मला आई नाही व्हायचंय' असं मी म्हणायला लागले. मग असं वाटलं की कदाचित मी हे आत्ता रागात म्हणत असेन नंतर माझा विचार बदलूही शकतो. आपण एग्स फ्रीज करून घेऊ आणि वाटलं पुढे तर बाळाचा विचार करू. पण सध्या या पॉइंटला मला ती जबाबदारी नकोय. मी हे इतकं मोकळेपणाने बोलतेये कारण मला माहितीये माझ्या आजूबाजूला अशा अनेक स्त्रिया आहेत ज्या यामधून जात आहेत आणि आजूबाजूला असं खरं बोलणारी लोकच नाहीयेत. तर तुमच्या आजूबाजूला कोण नसेल आणि थेरेपी नसेल, तर कोणीतरी नेहा पेंडसे बोलून गेलीये आणि तुम्ही त्याला एक विचार द्याल.' असं नेहा पेंडसेनं पुढे म्हटलं.दरम्यान, नेहा पेंडसेच्या कामाबद्दल सांगायचं तर सध्या ती 'तिघी' या सिनेमामुळे चर्चेत असून हा सिनेमा ६ मार्च रोजी प्रदर्शित होणार आहे.

***

# २ हजार ९८१ शेतकऱ्यांची ई-केवायसी, ३ हजार ८२७ जणांचे आधार सीडिंग प्रलंबित

## प्रक्रिया तात्काळ पूर्ण करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना अंतर्गत लाभ घेणाऱ्या पात्र शेतकऱ्यांपैकी जिल्ह्यातील २ हजार ९८१ शेतकऱ्यांची ई-केवायसी तर ३ हजार ८२७ शेतकऱ्यांचे आधार सीडिंग ( ) प्रलंबित असल्याची माहिती कृषी विभागामार्फत देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित शेतकऱ्यांनी आपली प्रलंबित ई-केवायसी, आधार सीडिंग तसेच बँक खाते करण्याची प्रक्रिया तात्काळ पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांचे खाते नाही, त्यांनी मध्ये खाते उघडून त्या खात्याला आधार संलग्न करून करून घ्यावे, असेही कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून वार्षिक प्रत्येकी ६ हजार रुपये तसेच नमो शेतकरी महासन्मान निधी योजना अंतर्गत राज्य शासनाकडून वार्षिक प्रत्येकी ६,००० रुपये असे एकूण १२ हजार रुपये प्रतिवर्षी शेतकरी कुटुंबांना वितरित केले जात आहेत. या लाभासाठी ई-केवायसी व आधार सीडिंग करणे अत्यावश्यक असून, प्रक्रिया पूर्ण न झाल्यास संबंधित शेतकरी लाभापासून वंचित राहू शकतात. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषी कार्यालय तसेच तालुक्यातील ग्राम नोडल अधिकारी यांच्याशी तात्काळ संपर्क साधून आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी, जेणेकरून कोणताही पात्र शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे यांनी केले आहे.





आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


# शेगांव तालुक्यातील ३४ ग्रामपंचायतींसाठी प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर

जनसंचलन/बुलढाणा




माहे जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या शेगांव तालुक्यातील ३४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी ग्रामविकास विभागाच्या आदेश दि. १७ फेब्रुवारी २०२६ नुसार प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. प्रभाग रचनामध्ये भास्तन, मच्छिंद्रखेड, डोलारखेड, भोनगांव, पहूरपुर्णा, मनमगांव, गोळेगांव बु., पाडसुळ, आडसुळ, झाडेगांव, श्री क्षेत्र नागझरी, हिंगणा वेज, वरखेड बु., जवळा बु., जवळा पळ., गव्हाण, तित्रव, वरुड, तरोडा कसवा, शिरसगांव निळे, गायगांव बु., टाकळी विरो, चिंचोली का., अळसणा, सांगवा, जानोरी, तरोडा तरोडी, खेड, गोलखेड, पहूरजिरा, जलंब, मोरगांव दि., बेलूरा व माटरगांव बु. या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. प्रभाग रचना कार्यक्रमानुसार तहसिलदार यांनी गुगल अर्थ नकाशे सुपर इम्पोज करून प्रत्येक गावाचे नकाशे अंतिम करणे, तलाठी व ग्रामसेवक यांच्या संयुक्त स्थळ पाहणीतून प्रभाग सीमा निश्चित करणे, तसेच तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत प्रारूप प्रभाग रचनेची तपासणी करणे आदी टप्प्यांची कार्यवाही निश्चित करण्यात आली आहे. प्रारूप प्रभाग रचना प्रस्ताव २३ मार्च २०२६ पर्यंत राज्य निवडणूक आयोगाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येणार असून, ३० मार्च २०२६ पर्यंत समितीमार्फत त्यास अंतिम मान्यता देण्यात येईल. त्यानंतर ७ एप्रिल २०२६ रोजी हरकती व सूचना मागविण्याबाबत जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हरकती सादर करण्याची अंतिम मुदत १३ एप्रिल २०२६ असून, प्राप्त हरकतींवर सुनावणी घेऊन २८ एप्रिल २०२६ पर्यंत प्रभाग रचना अंतिम करून राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात येणार आहे. आयोगाच्या मान्यतेनंतर ४ मे २०२६ रोजी अंतिम प्रभाग रचनेला व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल. तरी शेगांव तालुक्यातील सर्व नागरिकांनी सदर प्रभाग रचना कार्यक्रमाची नोंद घ्यावी व आवश्यकतेनुसार हरकती व सूचना निर्धारित मुदतीत सादर कराव्यात, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# जिल्हास्तरीय कृषी महोत्सव;बुलडाण्यात विक्री प्रदर्शन, मिनी सरस ५ ते ९ मार्चदरम्यान योजनेंतर्गत खरेदी-विक्री संमेलनाचे आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा**

ग्रामविकास विभाग व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा विक्री प्रदर्शन, मिनी सरस व पौष्टिक तृणधान्य जिल्हास्तरीय कृषी महोत्सव तसेच योजनेंतर्गत खरेदी-विक्री संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव दि. ५ ते ९ मार्च २०२६ या कालावधीत जिजामाता प्रेक्षागार क्रीडा व व्यापारी संकुल येथे होणार आहे. अन्न व पोषण सुरक्षा अभियानांतर्गत अन्नधान्य पिके व पौष्टिक तृणधान्यांचा प्रसार, मूल्यवर्धन आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. कार्यक्रमाचे आयोजन कृषी विभाग, महाराष्ट्र तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान () आणि कृषी संलग्न विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे. यामध्ये प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना () अंतर्गत लाभार्थी व उत्पादक गटांचा सक्रिय सहभाग राहणार आहे. कृषी महोत्सवात अन्नधान्य व पौष्टिक तृणधान्ये (नाचणी, ज्वारी, बाजरी आदी) यांचे प्रदर्शन व विक्री, शेतकरी उत्पादक कंपन्या () व स्वयं सहाय्यता गट () यांचे स्टॉल्स, तसेच सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांची उत्पादने प्रदर्शित करण्यात येणार आहेत. कृषी तज्ञांचे मार्गदर्शन व चर्चासत्रे, मूल्यवर्धन, ब्रँडिंग व पॅकेजिंग विषयक प्रात्यक्षिके आयोजित केली जाणार असून खरेदीदार व उत्पादक यांच्यात थेट संवाद साधण्यासाठी विशेष खरेदी-विक्री संमेलन होणार आहे. या उपक्रमामुळे स्थानिक शेतकरी, महिला बचत गट आणि सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योजकांना थेट बाजारपेठ उपलब्ध होऊन त्यांच्या उत्पन्नवाढीस चालना मिळणार आहे. तसेच पौष्टिक तृणधान्यांचे महत्त्व आणि पोषणमूल्यांविषयी जनजागृती होण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील सर्व शेतकरी, उद्योजक, स्वयं सहाय्यता गट, कृषी विद्यार्थी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी व आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.




## सामाजिक न्याय विभागाचे विविध पुरस्कारांसाठी अर्ज मागविले

**जनसंचलन/बुलढाणा**

समाज कल्याण क्षेत्रामध्ये वैशिष्ट्यपूर्ण व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती तसेच स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत विविध राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येतात. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, शाहू, फुले, आंबेडकर पारितोषिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार तसेच लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार यांचा समावेश आहे. सन २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षासाठी संबंधित पुरस्कारांकरिता शासनामार्फत दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने पात्र व्यक्ती व संस्थांनी संबंधित पुरस्कारासाठी अर्ज सादर करावेत. अर्ज संबंधित कार्यालयाकडून प्राप्त चेकलिस्टनुसार प्रस्ताव तयार करून चार प्रतींमध्ये सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बुलढाणा यांच्या कार्यालयात दि. १५ मार्च २०२६ पर्यंत सादर करावेत. सदर अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बुलढाणा कार्यालयात उपलब्ध असून महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर ://... येथे देखील उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बुलढाणा यांनी केले आहे.




## जळगाव जामोद पंचायत समितीमधील भ्रष्टाचाराविरोधात तक्रारदार आक्रमक

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

जळगाव जामोद पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी () श्री. संदिप उत्तमराव मोरे यांच्या कार्यकाळातील विविध गैरव्यवहार, पदाचा दुरुपयोग आणि भ्रष्टाचाराच्या तक्रारींबाबत राहुल भिकाजी वानखडे आणि धिरज अंबादास सावरकर यांनी जिल्हा परिषद बुलढाणा येथील उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी तक्रार सादर केली आहे. प्रभारी गटविकास अधिकारी श्री. मोरे यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून शासनाची फसवणूक केल्याचे गंभीर आरोप या निवेदनात करण्यात आले आहेत. तक्रारीतील प्रमुख मुद्दे: नियमबाह्य नियुक्ती: शासन निर्णयानुसार वर्ग ३ च्या कर्मचाऱ्याला वर्ग १ चा प्रभार देता येत नसतानाही श्री. मोरे यांना नियमबाह्य पद्धतीने प्रभारी बीडीओ पद देण्यात आले आहे. निधीचा अपहार: १५ व्या वित्त आयोगाचा निधी, मुद्रांक शुल्क आणि उपकर निधीच्या वाटपात मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाला असून, अस्तित्वात नसलेल्या कामांची देयके काढून शासनाची लूट केल्याचा आरोप आहे. नियमांचे उल्लंघन: लहान कुटुंब (२००५) कायद्याचे उल्लंघन करून तीन अपत्ये असतानाही त्यांनी शासनाची दिशाभूल केली आहे. या प्रकरणाची डीएनए चाचणी करून चौकशी करण्याची मागणी तक्रारदारांनी केली आहे. महिती देण्यास टाळाटाळ: माहिती अधिकार अधिनियम २००५ चे उल्लंघन करून भ्रष्टाचार लपवण्यासाठी ग्रामपंचायतींना कोणतीही माहिती न देण्याचे आदेश देऊन प्रशासकीय पारदर्शकतेचा बळी दिला जात आहे. तक्रारदार राहुल वानखडे आणि धिरज सावरकर यांनी निवेदनात म्हटले आहे की, ‌‌ह्या संपूर्ण प्रकरणाची विभागीय चौकशी लावून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. जर ०९/०३/२०२६ पर्यंत प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही, तर जळगाव जामोद पंचायत समितीसमोर लोकशाही मार्गाने जनआंदोलन छेडले जाईल. या आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याला शासन आणि प्रशासन जबाबदार राहील.‌‌ या तक्रारीमुळे जळगाव जामोद तालुक्यात खळबळ उडाली असून, आता जिल्हा परिषद प्रशासन या भ्रष्टाचाराच्या आरोपांवर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दैनिक निडर निर्भीड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भीड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८